पुढारी पा.नं.५.

# शाळेच्या सुरक्षारक्षकाकडून अल्पवयीन मुलीवर अत्याचार

## आरोपी सुरक्षारक्षकाला अटक

**मिरा रोड : पुढारी वृत्तसेवा**

भाईंदर पूर्वेच्या एका शाळेत बदलापूरमध्ये घडलेल्या घटनेची पुनरावृत्ती झाली आहे. एका ८ वर्षीय मुलीवर शाळेच्या सुरक्षा रक्षकाने लैंगिक अत्याचार केल्याची घटना समोर आली आहे. आरोपी विरोधात नवघर पोलीस ठाण्यात विविध कलमा अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

भाईंदर पूर्वेला एका शाळेजवळ असलेल्या इमारतीत राहणाऱ्या मुलीबरोबर हा प्रकार गुरुवारी सायंकाळी सहाच्या सुमारास घडला आहे. शाळांना दिवाळीच्या सुट्ट्या लागल्या असून सध्या सुट्टीमुळे शाळा बंद आहेत. पीडित मुलगी शाळेजवळील तिच्या इमारतीच्या आवारात खेळत होती. आरोपीने मुलीला फटाके देण्याच्या बहाण्याने बोलावून शाळेतील एका खोलीत नेले. त्या नराधम आरोपीने तिला खोलीत नेऊन तिचे लैंगिक शोषण करार असताना पीडित मुलगी रडू लागली आणि तेथून पळून गेली. पीडित मुलीने घडलेला प्रकार तिच्या पालकांना सांगितल्यानंतर त्यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली. तक्रार दाखल करताच गुन्हा दाखल करून पोलीसांनी आरोपीला अटक केली आहे.

### गुन्हा दाखल करण्याची मागणी

शाळेत घडलेल्या घटनेतील आरोपी सुरक्षा रक्षक हा २७ वर्षीय असुन तो झारखंडचा रहिवासी आहे. काही महिन्यांपूर्वीच त्याला शाळेत कामावर ठेवले होते. मिळालेल्या माहितीनुसार, आरोपीची पोलीस पडताळणी केली नसल्याचे सांगितले जात आहे. या प्रकरणी शाळेच्या संस्था चालक मालक यांच्यावरही गुन्हा दाखल करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्त्यांनी केली आहे.

म.टा. पु.पा-१.

# विजेच्या धक्क्याने ट्रकचालकाचा मृत्यू

**मिरा-भाईंदर :** मिरा-भाईंदरमध्ये विजेच्या धक्क्याने एका ३७ वर्षीय ट्रकचालकाचा मृत्यू झाला. गुरुवारी सकाळी ट्रक धूत असताना ही घटना घडली आहे. या प्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद काशिगाव पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. चेना गावात राहणारे विजय घोडके हे ट्रकचालक म्हणून काम करत होते. दिवाळी असल्याने ट्रकची पूजा करण्यापूर्वी तो धुण्यासाठी घोडके गुरुवारी सकाळी साडेसात वाजताच्या सुमारास चेना नदीवर ट्रक घेऊन गेले. नदीत पाणी कमी असल्याने ट्रक त्यांनी पाण्यात उतरवला. त्यानंतर त्यांनी ट्रकचा मागील भाग (ट्रॉली) धुण्यासाठी वर केला. यावेळी वर असणाऱ्या विद्युत तारांना ट्रॉली लागली. त्यामुळे वाहनात बसलेल्या घोडके यांना विजेचा धक्का बसून त्यांचा जागीच मृत्यू झाल्याची माहिती काशिगाव पोलिसांनी दिली.

म.टा-५.पा.२.

# तडीपार आरोपीला भाईंदरमधून अटक

**मिरा-भाईंदर :** तडीपार आदेशाचा भंग केल्याने एका आरोपीला भाईंदरमधून अटक करण्यात आली. हरिराम गुप्ता असे आरोपीचे नाव नसून त्याच्या विरोधात नवघर पोलिस ठाण्यात गुरुवारी गुन्हा दाखल करण्यात आला. भाईंदर पूर्वेला आरएनपी पार्क भागात राहणाऱ्या २३ वर्षीय हरिराम गुप्ता विरोधात विविध पोलिस ठाण्यांत गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. या पार्श्वभूमीवर मिरा-भाईंदर-वसई-विरार पोलिसांनी एप्रिल महिन्यापासून हरिराम याला पुढील एक वर्षासाठी मुंबई, ठाणे व पालघर आदी तीन जिल्ह्यांतून हद्दपार केले आहे. मात्र त्यांतरही नियम धुडकावून बुधवारी हरिराम भाईंदरच्या घरी येणार असल्याची माहिती पोलिसांच्या गुन्हे शाखेला मिळाली होती.

Scanned with OKEN Scanner

सामना पा.नं.२.

# कारवाईसाठी असलेल्या पोलिसांना अन्य कामे देऊ नका

## हायकोर्टाचे आदेश; फौजदारी कारवाईचा मागितला तपशील

मुंबई, दि. ३ (प्रतिनिधी) - नवी मुंबईतील अवैध बांधकामांवर कारवाई करण्यासाठी देण्यात आलेले पोलीस बळ अन्य कोणत्याही कामाकरिता वापरू नये, असे स्पष्ट आदेश उच्च न्यायालयाने नवी मुंबई पोलिसांना दिले आहेत.

मुख्य न्यायाधीश देवेंद्र कुमार उपाध्याय व न्या. अमित बोरकर यांच्या खंडपीठाने हे आदेश दिले आहेत. बेकायदा बांधकामांवर कारवाई करण्यासाठी नवी मुंबई पालिकेला देण्यात आलेला पोलीस ताफा पुरेसा नाही. त्यामुळे आता जे पोलीस कारवाईसाठी राखीव ठेवण्यात आले आहेत, त्यांना अन्य कोणतेही काम देऊ नका. अगदीच आवश्यकता असेल तर त्यांना दुसरे काम द्या, असे न्यायालयाने आदेशात नमूद केले आहे.

### ७८ पदे मंजूर, केवळ २८ पोलीस उपलब्ध

बेकायदा बांधकामांवर कारवाई करण्यासाठी ७८ पोलिसांचे पथक नवी मुंबई पालिकेसाठी मंजूर करण्यात आले आहे. त्यातील केवळ २८ पोलीस पालिकेसोबत असतात. आठ वॉर्डमध्ये कारवाई करताना हे पोलीस पुरेसे नाहीत. कधी-कधी परिस्थिती हाताबाहेर जाते. असे असतानाही उपलब्ध पोलिसांपैकी काही जणांना उत्सवाचा बंदोबस्त किंवा अन्य कामे दिली जातात, असे पालिकेने खंडपीठाच्या निदर्शनास आणले.

### सहा वर्षांपासून न्यायालयाचे आदेश कागदावरच


▪ नवी मुंबई पालिका, सिडको, एमआयडीसी येथील अवैध बांधकामे रोखण्यासाठी सहा वर्षांपूर्वी न्यायालयाने सविस्तर आदेश दिले होते. या तिन्ही प्रशासनाने विशेष सेलची स्थापना करावी, जेणेकरून कारवाई करताना हद्दीचा वाद होणार नाही. कारवाई करताना समन्वय राहील, असे न्यायालयाने आदेशात नमूद केले आहे. यासह न्यायालयाने दिलेले अनेक आदेश या तिन्ही प्रशासनांनी केवळ कागदावर लिहून ठेवले आहेत. त्याची अंमलबजावणी अद्याप झालेली नाही. प्रशासन व त्यांच्या अधिकाऱ्यांचा हा निष्काळजीपणा आम्ही खपवून घेणार नाही, असेही न्यायालयाने बजावले आहे.

### पुरेसे पोलीस बळ द्या

▪ नवी मुंबई पालिकेसाठी ७८ पोलिसांचा ताफा मंजूर करण्यात आला आहे. किमान एवढे पोलीस पालिकेला कारवाईसाठी उपलब्ध होतील याची व्यवस्था राज्य शासनाने करावी, असे आदेशही न्यायालयाने दिले आहेत.

### नेमकी काय कारवाई सुरू केलीत?

▪ १०४४ बेकायदा बांधकामांवर नेमकी काय फौजदारी कारवाई सुरू करण्यात आली आहे, याची माहिती प्रतिज्ञापत्रावर सादर करण्याचे आदेश न्यायालयाने नवी मुंबई पालिकेला दिले आहेत.



### नवी मुंबईतील अवैध बांधकामांचा तपशील

▪ येथे एकूण ६५६५ अवैध बांधकामे आहेत. त्यातील ३२१४ बांधकामांना एमआरटीपी कायद्यांतर्गत नोटीस देण्यात आली आहे. २८६३ बांधकामांना अन्य नियमांतर्गत नोटीस दिली आहे. ३०९६ बांधकामांवर कारवाई सुरू आहे. १०४४ बांधकामांवर फौजदारी कारवाई सुरू केली आहे, असा तपशील नवी मुंबई पालिकेने प्रतिज्ञापत्रावर सादर केला आहे.

लोकमत पु.पा-१

# मीरा-भाईंदरमध्ये तिरंगी लढतीचीच शक्यता

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मीरा-भाईंदर मतदारसंघात भाजपमधून उमेदवारीसाठी अनेक जण इच्छुक असताना माजी आ. नरेंद्र मेहतांच्या पदरात उमेदवारी पडली आहे. त्यामुळे भाजपकडून उमेदवारीसाठी इच्छुक असलेल्या अपक्ष आ. गीता जैन यांची निराशा झाली. त्यांनी अपक्ष म्हणून पुन्हा अर्ज भरला आहे. दुसरीकडे भाजपमधील अनेक इच्छुकांनी उमेदवारी अर्ज भरले असताना, त्यांना माघार घेण्यासाठी स्थानिक भाजपकडून फारसे प्रयत्न होताना दिसत नाहीत. जिल्हाध्यक्ष किशोर शर्मा यांनीच पक्षश्रेष्ठींवर जबाबदारी असल्याचे सांगितले आहे.

### अनेक अपक्ष रिंगणात

आ. जैन यांनी २०१९ प्रमाणेच पुन्हा अपक्ष लढण्याचे ठरवले, तर ॲड. व्यास यांनी पक्ष निर्णय मान्य केला, परंतु भाजपचे मेहता समर्थक असलेले एजाज खतिब, तर व्यास समर्थक चंद्रकांत मोदी, सुरेश खंडेलवाल, मेहतांच्या पत्नी सुमन, हंसुकुमार पांडे आदींनी भाजपच्या नावे वा अपक्ष म्हणून अर्ज दाखल केले आहेत. मेहतांना उमेदवारी मिळाल्याने त्यांच्या पत्नी सुमन या माघारी घेतील, परंतु अन्य बंडखोरांना माघार घेण्यासाठी भाजपच्या स्थानिक जिल्हाध्यक्षांसह मेहता आणि पक्षश्रेष्ठी काय प्रयत्न करतात, याकडे लक्ष लागले आहे.

Scanned with OKEN Scanner

लोकमत ५.११.१.

# सहाही ठिकाणी उमेदवारी मागे घेणार नाही - ठाकूर

## 'एक दिवसात नवी निशाणी लोकांपर्यंत नेऊ'

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** पालघर जिल्ह्यातील सहाही ठिकाणी उमेदवारी अर्ज भरलेले असून एकही अर्ज मागे घेणार नाही. बविआ सहाही जागा लढवणार आहे. तसेच नवीन निशाणी एका दिवसात लोकांपर्यंत पोहोचवली जाईल, असे बविआचे अध्यक्ष हितेंद्र ठाकूर यांनी शनिवारी सांगितले.

विक्रमगड येथील शरद पवार गटाचे उमेदवार सुनील भुसारा आणि डहाणूचे सीपीएमचे उमेदवार विनोद निकोले हे बविआच्या उमेदवारांचे अर्ज मागे घेण्यासाठी आले होते. लोकसभेला आमच्या हिशेबाने लढतो, पण विधानसभेला आम्ही ठरवू, असेही हितेंद्र ठाकूर यांनी सांगितले.

निशाणी काय आहे, आता सोशल मीडियाचा जमाना आहे. जी मिळेल ती निशाणी एका दिवसात लोकांपर्यंत पोहोचविण्याचे काम पक्षाचे कार्यकर्ते, मीडिया करेल. इतक्या खालच्या दर्जाचे राजकारण कोणी करू नये. एक तर नक्की झाले आहे. निशाणी कोण पळवतो, ज्यांना हरण्याची भीती असते, असेच लोक उपद्व्याप करतात. लोकांना सगळे कळते, लोकांना सर्व माहीत असून ते बघत आहेत.



### चष्मा, शिट्टी, रिक्षा...

आतापर्यंत पहिली निशाणी चष्मा, त्यानंतर दोन निवडणुकीत शिट्टी निशाणी पळवली. रिक्षा निशाणी होती ती पण पळवली. आता परत शिट्टी पळविण्यात आली. निशाणीसाठी काही नियम, तरतुदी आहेत. त्यामुळे तिन्ही आमदारांना शिट्टी निशाणी दिली पाहिजे, पण काही लोक दबाव आणत असतात. शिट्टी ही निशाणी नसेल तेव्हा लोकांना राजकारण समजेल, लोक भडकतील.

हे चोराचोरीचे आणि पळवापळवीच्या धंद्यांबाबत लोकांना थोडाफार विसर पडला असेल, तर परत त्यांच्या आठवणी ताज्या होतील. उलट कार्यकर्ते द्वेषाने आणि जोमाने निवडणुकीत कामे करतील. शिट्टी निशाणी नाही भेटली तरी जड जाणार नाही. नवीन निशाणी सोशल मीडियाच्या माध्यमातून एका दिवसात लोकांपर्यंत पोहोचवली जाईल, असेही हितेंद्र ठाकूर यांनी सांगितले.

# गळफास घेऊन संपवले जीवन



**नालासोपारा :** सत्पाळा येथील आदिवासी एकता पाडा येथे राहणाऱ्या जयेश हरपाले (२४) या तरुणाने आत्महत्या केली आहे. शुक्रवारी रात्री दारूच्या नशेत जयेश घरी आला होता. त्यावेळी त्याला आईने दारू पिऊ नको, असे समजावले होते. त्याने दारूच्या नशेत सासरी जातो, असे सांगितले होते. त्याने सत्पाळा येथील उघडीवरील झाडाला गळफास घेत आत्महत्या केली. अर्नाळा पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे.

# वृद्धाने केली आत्महत्या



**नालासोपारा :** विजयनगरच्या ज्योती विनायक अपार्टमेंटमध्ये राहणाऱ्या शांताराम गोरविले (७०) यांनी आत्महत्या केली आहे. त्यांनी शुक्रवारी रात्री मनवेल पाडा रोडवरील विजयानंद बिल्डिंगच्या समोरील फूटपाथच्या कडेला असलेल्या झाडाच्या फांदीला नायलॉन दोरीच्या साहाय्याने गळफास घेत आत्महत्या केली आहे. विरार पोलिसांनी शनिवारी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे.

Scanned with OKEN Scanner

लोकमत ५.५१.१.



वसईतील गिरीज गावातील बदामी स्टॉप येथे भरधाव कारचालकाचे नियंत्रण सुटल्याने अपघात झाला. या घटनेत दोन्ही वाहनांचे नुकसान झाले आहे.

# गिरीजमध्ये अपघातात दुचाकीस्वाराचा मृत्यू

## चालकाचे कारवरील नियंत्रण सुटले

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : ऐन दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर गिरीज गावातील बदामी स्टॉप येथे झालेल्या कार व दुचाकीच्या भीषण अपघातात दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाल्याने गिरीज गावावर शोककळा पसरली आहे. किरण पाटील (वय ४७, रा. दत्तनगर, गिरीज) असे मृत दुचाकीस्वाराचे नाव आहे.

शुक्रवारी रात्री घडलेल्या या घटनेत कारचालक आरोपी वेद पाटील (वय २४) हा गिरीजवरून वसईच्या दिशेने भरधाव वेगात जात होता. त्यावेळी दुचाकीवरून गिरीजच्या दिशेने जाणाऱ्या किरण यास जबर धडक दिली. दुचाकीला धडक दिल्यानंतरही कार थांबली नाही. नियंत्रण गमावलेल्या कारचालकाने येथील महावितरणच्या खांबाला जोरदार धडक दिली.


### दोन्ही वाहनांचे झाले मोठे नुकसान

- अपघातात कारचे पुढील चाक तुटून दुसऱ्या दिशेला फेकले गेले. दोन्ही वाहनांचे नुकसान झाले. अपघातानंतर वैद्यकीय इलाजासाठी दुचाकी चालकास बंगली येथे कार्डिनल ग्रेशीयस हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले, परंतु तत्पूर्वी त्याचा मृत्यू झाला होता.
- किरण हा मितभाषी, सुस्वभावी व्यक्तिमत्त्व म्हणून परिचित होता. ऐन दिवाळी सणाच्या दिवशी त्याच्या अचानक अशा जाण्याने या गावावर दुःखाचे सावट पसरले.
- त्याच्या पश्चात पत्नी, १३ वर्षीय मुलगी, आई, भाऊ असा परिवार आहे. शनिवारी दुपारी गिरीज येथील स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात त्याच्या पार्थिवावर अंतिम संस्कार करण्यात आले. याबाबत वसई पोलिस ठाण्यामध्ये कार चालकाविरोधात गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली आहे.

पुण्यनगरी पु.पा.४.

# काशिमीऱ्यात फर्निचर कंपनीला आग

## सात तासानंतर आगीवर मिळवले नियंत्रण



**मीरा रोड** - काशिमीरा येथे मीरा इंडस्ट्रियल इस्टेट च्या बाजूला असलेल्या फर्निचर कंपनीला मोठ्या प्रमाणात आग लागल्याची घटना शुक्रवारी रात्री घडली. आग विझवण्यासाठी अग्निशमन विभागाने सुमारे ७ तास शर्तीचे प्रयत्न करून आग आटोक्यात आणली. या आगीत कोणतीही जीवित हानी झाली नसली तरी कंपनीतील लाखो रुपयांचे फर्निचर जळून खाक झाले आहे.

मीरा भाईंदर शहरात सर्वत्र दिवाळीचा उत्सव साजरा केला जात असताना काशीमीरा येथील इंडस्ट्रियल इस्टेटच्या बाजूला असलेल्या संजर फर्निचर या कंपनीला शुक्रवारी रात्री १० च्या सुमारास आग लागली. ही आग फटाक्यामुळे लागली असल्याचे सांगितले जात आहे. ही आग एवढी भयंकर होती की परिसरात सर्वत्र आगीचे कल्लोळ दिसत होते. आग लागल्याची माहिती अग्निशमन दलाला मिळताच अग्निशमन विभागाच्या गाड्या हजर झाल्या.

परंतु ही आग तीव्र स्वरूपाची असल्यामुळे मुंबई, ठाणे व वसई विरार येथुन अग्निशमन विभागाची प्रत्येकी एक गाडी बोलावण्यात आली. मीरा भाईंदर अग्निशमन विभागाच्या तीन गाड्या व पाण्याचे सहा टँकर, तसेच १० पाण्याचे टँकर मागवण्यात आले होते. आग विझवण्यासाठी अग्निशमन विभागाला जवळपास ७ तास शर्थीचे प्रयत्न करावे लागले. मीरा भाईंदर अग्निशमन विभागाचे ६० ते ६५ कर्मचारी व बाहेरून आलेले जवळपास २० कर्मचारी आग विझवण्यासाठी काम करत होते. आगीत कोणतीही जीवितहानी झाली नसून कंपनीचे करोडो रुपयांचे नुकसान झाल्याचे सांगितले जात आहे.

◆अग्निशमन विभागाच्या गाड्या देखभाल दुरुस्ती अभावी एक टँकर व आग विझवण्याची गाडी खराब असल्याचे सांगितले जात आहे. तसेच ईतर गाड्यांची देखील नियमीत देखभाल दुरुस्ती नाही त्यामुळे गाड्यांचे सायरन वाजत नाही. तसेच करोडो रूपये खर्च करून नवीन मागवलेल्या टीटी एम व ब्रुंचू या गाड्या देखील हँग होत असून व्यवस्थित चालत नसल्याचे सांगितले जात आहे.

◆त्यामुळे अग्निशमन विभागाचा कारभार व्यवस्थित चालत नसल्याचे दिसून येत आहे. तसेच शहरात महापालिकेने १२ मोकळ्या ठिकाणी फटाके विक्रीला परवानगी दिली होती. परंतु या नियमाचे कोणत्याही प्रकारे पालन झाल्याचे दिसून येत नाही. शहरात सर्रास नियमांचे उल्लंघन करत गल्लीबोळात, चौकाचौकात फटाके स्टॉल लागल्याचे दिसून येत आहे.

पुण्यनगरी पु.पा.७.

# मीरा-भाईंदरमध्ये दोन दिवसांत ३४ ठिकाणी आगीच्या घटना

**मीरा रोड** : मीरा-भाईंदर शहरात गुरुवार व शुक्रवार या दोन दिवसांत ठिकठिकाणी आग लागण्याच्या ३४ घटना घडल्या आहेत. लागलेल्या आगी विझवण्यासाठी अग्निशमन विभागाची धावपळ सुरु होती. दिवाळीचा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. सण साजरा होत असताना प्रशासनाकडून आवाहन करूनही नागरिकांकडून सुरक्षेची काळजी घेतली जात नसल्यामुळे आग लागण्याच्या घटना घडतात. मीरा भाईंदर शहरात गुरुवारी १६ ठिकाणी तुळलक आग लागण्याच्या घटना घडल्या होत्या. तर शुक्रवारी रात्री शहरात विविध १८ आग लागण्याच्या घटना घडल्या. अग्निशमन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी यशस्वीपणे कर्तव्य बजावत आग विझवल्या असून, कुठेही जीवितहानी झाली नाही.

शहरात अग्निशमन विभागांकडून फटाके विक्रीसाठी परवानगी दिली जाते. न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे नियमांचे काटेकोर पालन करून देणे आवश्यक असताना शहरात अनेक ठिकाणी नियमाचे उल्लंघन करत रस्त्यांवर, गल्लीबोळात तसेच चौका चौकात फटाके स्टॉल लागल्याचे दिसुन आले. नागरिकांच्या सुरक्षेची काळजी न घेता कारवाई करण्याकडे पोलीस व महापालिका प्रशासनाकडून दुर्लक्ष करण्यात आले. त्यामुळे सामान्य नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे. याला जबाबदार असणाऱ्या संबधित अधिकाऱ्यावर कारवाई करण्याची मागणी केली जात आहे.

Scanned with OKEN Scanner

नवभारत पृ-पा-३.

# चुनाव निरीक्षक कुमार ने की समीक्षा बैठक

## निर्वाचन कार्य की प्रक्रिया को पारदर्शी पूर्वक कराने दिए निर्देश



■ **भाईंदर** (सं). आगामी महाराष्ट्र विधानसभा आम चुनाव-2024 की पृष्ठभूमि में रविवार को चुनाव निरीक्षक कुमार पुरुषोत्तम एवं मीरा भाईंदर मनपा के आयुक्त एवं प्रशासक संजय श्रीपतराव काटकर ने 145 मीरा भाईंदर विधानसभा क्षेत्र के चुनाव निर्णय अधिकारी सुनील भुताले, चुनाव रिटर्निंग अधिकारी एवं सभी नोडल अधिकारियों की उपस्थिति में चुनाव के कामकाज की समीक्षा कर महत्वपूर्ण निर्देश दिये. जिसमें निर्वाचन क्षेत्रों में मतदाता जागरूकता के लिए स्वीप टीम के माध्यम से विभिन्न उपाय कर मतदान प्रतिशत को लोकसभा से अधिक बढ़ाने का निर्देश दिया गया. मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) एवं आशा कार्यकर्ता के माध्यम से निर्वाचन क्षेत्र की सोसायटियों में गतिविधियों के क्रियान्वयन के संबंध में महत्वपूर्ण निर्देश दिये गये. स्ट्रांग रूम के बारे में विस्तृत जानकारी ली गयी. मतदान केंद्र पर साफ-सफाई बनाए रखने के लिए एक मोबाइल टीम की स्थापना की गई और मतदान के एक दिन पहले मतदान केंद्रों और शौचालयों को साफ-सुथरा रखने के निर्देश दिए गए.वास्तविक मतदान दिवस पर काम करने वाले चुनाव कर्मचारियों के प्रशिक्षण के संबंध में समीक्षा की गई और उचित उपाय सुझाए गए.

### डाक मतपत्रों को लेकर सतर्कता बरतने दिए निर्देश

चुनाव रिटर्निंग अधिकारियों को डाक मतपत्रों को लेकर सतर्कता बरतने के महत्वपूर्ण निर्देश दिये गये. इस संबंध में क्षेत्रीय अधिकारियों की पूरी समीक्षा की गई और महत्वपूर्ण सुझाव भी दिए गए. निर्वाचन कार्य की प्रक्रिया को पारदर्शी पूर्वक सम्पन्न कराने हेतु समय-समय पर मीडिया को भी निर्वाचन कार्य की जानकारी देने के निर्देश दिये गये, ताकि लोगों के बीच भ्रम की स्थिति को दूर किया जा सके और चुनाव प्रक्रिया को पारदर्शी तरीके से संचालित किया जा सके.उक्त समीक्षा बैठक में चुनाव (सामान्य) निरीक्षक कुमार पुरुषोत्तम, मनपा आयुक्त एवं प्रशासक संजय श्रीपतराव काटकर, एमबीवीवी पुलिस उपायुक्त प्रकाश गायकवाड, चुनाव निर्णय अधिकारी सुनील भुताले, सहायक चुनाव निर्णय अधिकारी नीलेश गौंड कल्पिता पिम्पले, राजकुमार गैरत, नायब तहसीलदार प्रदीप मुकने एवं सभी नोडल अधिकारी उपस्थित थे.

Scanned with OKEN Scanner

H.B.T. पा.नं. 4.

## हाई कोर्ट ने दिया है मनपा प्रशासन को कार्रवाई का आदेश

# अब चुनाव तक नहीं तोड़ी जाएंगी नालासोपारा की 41 अवैध इमारतें!





■ **निसं, नालासोपाराः** विधानसभा चुनाव होवे तक यानी एक महीने तक नालासोपारा की विवादित 41 अवैध इमारतों की तोड़क कार्रवाई पर रोक लगाई गई है। यह जानकारी मनपा के संबंधित विभाग अधिकारी ने दी है। मनपा अधिकारी का कहना है कि चुनाव आयोग के एक नियम के आधार पर मतदाताओं को मतदान का अधिकार है, ऐसे में उन्हें विस्थापित नहीं किया जाना चाहिए। इसलिए प्रशासन ने एक महीने तक तोड़क कार्रवाई पर रोक लगाई गई है। मनपा के इस फैसले से निवासियों में फौरी तौर पर थोड़ी राहत मिली है, लेकिन उनका डर कम नहीं हुआ है।

### 2010-12 के दौरान खड़ी हुई अवैध इमारतें

बता दें कि नालासोपारा पूर्व स्थित अग्रवाल नगरी में लगभग 30 एकड़ का एक बड़ा भूखंड है। इसमें कुछ भूखंड निजी थे और कुछ भूखंड डंपिंग ग्राउंड और सीवेज ट्रीटमेंट प्लांट (एसटीपी) के लिए आरक्षित रखे गए थे। आरोप है कि साल 2006 में इस जमीन पर बहुजन विकास आघाडी के पूर्व नगरसेवक ने कब्जा कर लिया था। साल 2010 से साल 2012 की अवधि में इस भूखंड पर फर्जी तरीके से निर्माण अनुमति (सीसी) और ऑक्यूपेंसी सर्टिफिकेट यानी अधिभोग प्रमाणपत्र (ओसी) के आधार पर चार-चार मजिला की 41 इमारतों को खड़ा कर दिया गया। इन इमारतों में लगभग तीन हजार परिवार रहते हैं।

### जनहित याचिका पर अदालत ने सुनाया फैसला

एक जनहित याचिका पर बॉम्बे हाई कोर्ट ने इन 41 इमारतों को अवैध घोषित कर मनपा प्रशासन को कार्रवाई करने का निर्देश दिया। कोर्ट के आदेश पर मनपा ने कार्रवाई की प्रक्रिया शुरू कर दी, पुलिस प्रशासन से भी बंदोबस्त की मंजूरी भी मिल चुकी है। मनपा के सहायक आयुक्त मोहन संखे ने बताया कि पहले चरण में 7 जर्जर इमारतों पर कार्रवाई होनी थी।

# युवक ने लगाई फांसी, हुई मौत

■ **निसं, नालासोपाराः** धानिव बाग में शुक्रवार की शाम को एक युवक ने फांसी लगाकर आत्महत्या कर ली। पेल्हार पुलिस से मिली जानकारी के अनुसार, धानिवबाग स्थित साई सिद्धि चॉल में रहनेवाले मुनीम बर्फीलाल यादव (25) ने शुक्रवार की शाम को अज्ञात कारणों से लोहे के पाइप पर गमछा बांधकर फांसी लगा ली।

# पंखे से लटककर युवक ने दी जान

■ **निसं, नालासोपाराः** ओसवाल नगरी में रहनेवाले 31 वर्षीय युवक ने पंखे से लटक कर जान दे दी। तुलिंज पुलिस के अनुसार, सुनील सुरेंद्र जायसवांल (31) ने किचन में फांसी लगा ली।

Scanned with OKEN Scanner

दैनिक भास्कर पा.नं. ५

# वसई-विरारः जागरूक जनता पूछ रही सवाल, कहां है सड़क, पानी और अस्पताल

गोपाल गुप्ता | वसई

विधानसभा चुनाव का बिगुल बज चुका है। राजनीतिक पार्टियों ने अपना-अपना प्रचार शुरू कर दिया है। वसई-विरार में पिछले दो दशक से सत्ता कर रही बहुजन विकास आघाडी (बविआ) से यहां की जनता विकास कार्यों का हिसाब मांग रही है, वहीं उसे टक्कर देने उतरी भाजपा और कांग्रेस पर विश्वास करने से कतरा रही है। कई वर्षों से वसई-विरार क्षेत्र में मूलभूत सुविधाओं की कमी और भ्रष्टाचार के चलते उम्मीदवारों के विकास के वादे जनता को झूठे ही लग रहे हैं। शहर के जागरूक नागरिक अब नेताओं से सवाल करने में जुट गए हैं। निवासी नेताओं से पूछ रहे हैं सड़क, पानी और अस्पताल कहां हैं।

एक स्थानीय निवासी ने बताया कि शहर जनसंख्या बढ़ने के कारम



वाहनों में भी बेतहाशा वृद्धि हुई है। ऐसे में शहर में पार्किंग जोन, गैरेज, सर्विस सेंटर, अच्छी सड़कें जैसी मांग भी बढ़ी है, लेकिन मनपा की लापरवाही से यहां कोई भी सुविधा वैध तरीके से उपलब्ध नहीं है। सड़कों के दोनों तरफ अवैध पार्किंग होती है। रेलवे स्टेशनों के आस-पास भी यही हाल है। सड़कों के किनारे सर्विस सेंटर और गैरेज वालों ने भी अतिक्रमण कर रखा है। वसई-विरार शहर की सड़कों के किनारे अवैध गैरेज, अवैध सर्विस सेंटर, अवैध पार्किंग, कचरे के ढेर और सड़कों पर बड़े-बड़े गड्ढे मनपा की लापरवाही के गवाह हैं। यहां की सड़कों पर सफर करना किसी चुनौती से कम नहीं है। सड़कों के किनारे अतिक्रमण की वजह से दुर्घटनाएं आम हैं। मनपा प्रशासन न तो इस अवैध कारोबार पर कार्रवाई कर पा रही है, न इनके लिए वैकल्पिक व्यवस्था है।

## मूलभूत सुविधाओं के लिए तरस रही जनता

वसई-विरार शहर की जनता शहर में अच्छी सुसज्जित अस्पताल की कमी से जूझ रही है। शहर के लोगों को मुंबई या फिर अन्य राज्यों जाना पड़ता है। शहर के लोगों का कहना है कि 30 वर्ष में शहर की जनता सड़क, पानी, रोजगार और अस्पताल की कमी परेशान है। ये हादसों को न्योता दे रहे हैं। बारिश के कारण हुए गड्ढों ने सड़कों की सूरत बिगाड़ दी है। अच्छी सड़के नहीं होने से लोगों की मौत हो चुकी है।

The. Free Press Journal P-6 The Times of India -11

# Property dispute: Man arrested for stabbing mother

**Suresh Golani**

MIRA BHAYANDAR

The Bhayandar police have arrested a 30-year-old man on charges of grievously injuring his mother by assaulting her with a knife allegedly over a property dispute in the Shastri Nagar area of Bhayandar West at around 2pm on Friday. According to the police, the victim identified as Kamla Chandubhal Dantanai, 52, lives alone after the demise of her husband in 2021 and sells flowers near a temple for a living. She has two sons and a daughter – all married and staying separately.

In her complaint to the police, Kamla stated that after her husband's demise, she inherited a tenement owned by him in the Shanti Nagar area of Dahisar. The slum cluster is now under re-development for the construction of a 25-storey tower in which she had been allotted a flat in exchange for the tenement. Her younger son Sanjay, 30, who lives in the Rawalpada area of Dahisar had been demanding the papers of the property. A few hours after a heated exchange of words over the issue with his mother near the temple where she sells flowers, Sanjay barged into his mother's tenement in the afternoon and repeatedly stabbed her with a knife before fleeing the spot. He also threatened to kill his siblings if she did not transfer the property in his name. A profusely bleeding Kamla who suffered stab wounds on her head, hands, shoulders and chest was rushed to a nearby hospital where her condition is said to be stable.

Meanwhile, the police arrested Sanjay and booked him under sections 109(1) for attempt to commit murder and 351(2) for criminal intimidation of the Bhartiya Nyay Sanhita (BNS). Further investigations were underway.

THE TIMES OF INDIA, MUMBAI
MONDAY, NOVEMBER 4, 2024

# Two men drown in Palghar waterfall

TIMES NEWS NETWORK

**Mumbai:** Two men, from a group of five friends, lost their lives by drowning in the 100-metre deep Kal Mandavi waterfall in Jawhar taluka of Palghar district on Friday. The waterfall is characterised by its rocky landscape and continuous water flow throughout the year.

The group, who resided in Boisar, planned a Diwali celebration at the waterfall. The men were enjoying the waterfall when Akhilesh Mishra (27) and Khurshid Naik (31) lost their footing and drowned. Their friends raised an alarm, but the victims were swept away by the strong water currents. The Jawhar police and fire brigade personnel arrived at the location and recovered the bodies.

The waterfall is a popular destination among district residents. Local villagers regularly caution visitors against entering the waterfalls during the monsoon season due to previous drowning incidents. The location is considered relatively secure during the summer months.

An accidental death case was registered by the police. The statements of the surviving friends were recorded. Police said an investigation is underway to determine if the victims consumed alcohol prior to entering the water.

Scanned with OKEN Scanner